MHRT110001362026

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७०/२०२६**
**सरकार वि. रमेश पांडुरंग पवार**
**निशाणी ०६ लगत**

*न्या य नि र्ण य*
*(घोषित दिनांक ०३.०८.२०२६)*

प्रस्तुतचा खटला हा आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) चे गुन्ह्यासाठी चालविण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात आरोपी हजर झाल्यानंतर त्याला गुन्ह्याचा तपशील वाचून दाखविण्यात आला. आरोपीने गुन्हा मान्य नसल्याचे निवेदन न्यायालयासमक्ष केले आहे. अभिलेखावरील पुरावा विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होतात त्यांचे निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत –

| *अ.क्र.* | *मुद्दे* | *निष्कर्ष* |
|---|---|---|
| १. | सरकारपक्षाने असे सिध्द केले आहे काय की, दि.०५.०५.२०२६ रोजी १९.०० वा. चे सुमारास, मौजे विसापूर, कारुळ, बौध्दवाडी, ता.गुहागर, जि.रत्नागिरी येथे आरोपी विनापरवाना बेकायदेशीररित्या गावठी हातभट्टीची दारु विक्री करण्यासाठी ताब्यात बाळगून मिळुन आला आणि त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला? | **नाही** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

*का र ण मी मां सा*

०२. प्रस्तुतच्या खटल्यात अभियोगपक्षातर्फे केवळ एका साक्षीदाराची साक्ष नोंदविली आहे. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षास तदनंतर संधी देवून देखील इतर साक्षीदार यांना हजर करुन त्यांचा पुरावा नोंदवू शकलेला नाही. त्यामुळे

निशाणी क्र.१ वर योग्य तो आदेश पारीत करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला व प्रकरण उपलब्ध पुराव्याआधारे गुणवत्तेनुसार विचाराधीन घेण्यात आले आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्ह्याच्या अनुषंगाने पुरावा आलेला असल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अंतर्गत निवेदन नोंदवण्यात आले नाही. सहाय्यक सरकारी वकील व आरोपीचे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

*मुद्दा क्र.०१ करिता –*

०३. अभियोगपक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणात **साक्षीदार क्र.१ संतोष दत्ताराम भुवड** यांची साक्ष नोंदविण्यात आली आहे. त्यामध्ये असे आले आहे की, अंदाजे २ महीन्यांपूर्वी पोलीसांनी त्याला बोलावून सही करायला सांगितले, त्याप्रमाणे त्यांनी सही केली. पोलीसांनी त्याचे समक्ष काही जप्त केले नव्हते. सदरील साक्षीदारास दि.०५.०५.२०२६ रोजीचा पंचनामा दाखवला. त्यावर अ.क्र.०१ वर त्याची सही आहे. परंतू त्याला त्यातील मजकूराबाबत काही माहित नाही असे सांगितले. तसेच तो आरोपीला ओळखत नसल्याचे देखील त्याने कथन केलेले आहे. सदर साक्षीदार अभियोगपक्षास सत्य सांगून मदत करत नसल्याने सहाय्यक सरकारी वकीलांनी त्यास भारतीय पुरावा कायदा, १८७२ चे कलम १५४ प्रमाणे उलटतपासात विचारता येतील अश्या स्वरूपाचे प्रश्न विचारले. तरी देखील सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास उपयुक्त असे काही सांगितले नाही. त्या कारणाने असे दिसते की, सदर साक्षीदाराचा आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आला नाही.

०४. अभियोग पक्षाने खरोखरच आरोपीच्या ताब्यातून गावठी हातभट्टीची दारु जप्त केल्याचे शाबीत करण्यासाठी खबरी तसेच छापा पथकातील इतर साक्षीदार यांना तपासणे आवश्यक होते. परंतु, तसे त्यांनी याकामी कष्ट घेवून केल्याचे दिसून येत नाही.

०५. एखाद्या आरोपीस महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये असलेल्या गुन्ह्यासाठी दोषी ठरविण्यासाठी आरोपीच्या ताब्यातून विनापरवाना किंवा आरोपी विनापरवाना गावठी हातभट्टीची दारु विक्री करत

असल्याचे सिध्द करणे आवश्यक आहे. प्रस्तुतच्या प्रकरणात अभियोग पक्षाने फिर्यादी, तपासी अंमलदार आणि छापा पथकातील इतर साक्षीदार यांची साक्ष नोंदविली नाही. प्रस्तुत प्रकरणात रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल करण्यात आलेला आहे, परंतु अभियोग पक्षाने मुळात तपासी अंमलदार यांची साक्ष याकामी नोंदवलेली नसल्यामुळे सदरचा मुद्देमाल आरोपीच्याच ताब्यातून जप्त करण्यात आला होता हे सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द लावण्यात आलेले दोषारोप निःसंशयपणे शाबीत होवू शकत नाहीत. सबब, वरील विवेचनाआधारे **मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी** दिले आहे.

*मुद्दा क्र.२ करिता –*

०६. मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी दिल्याने आरोपीला महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) चे गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करणे न्यायोचित राहील, म्हणून मुद्दा क्र.२ दाखल खालीलप्रमाणे आदेश पारित केला आहे–

## *आ दे श*

१) आरोपी नामे **रमेश पांडुरंग पवार**, **रा.घर क्र.३५६, चिखली कदमवाडी, ता.गुहागर, जि.रत्नागिरी** याची महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये असलेल्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. आरोपीस मुक्त करण्यात यावे.

२) आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३) प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमाल सदर खटल्याच्या न्यायनिर्णयास आव्हान देण्याची मुदत संपल्यानंतर संबंधित राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावा.

४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ) प्रमाणे रक्कम रु.१५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र अपिल झाल्यास अपिलकामी हजर राहणेसाठी दाखल करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात श्रुतलेखित व घोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURT, MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PRATIK VIJAY KAPADIA
Date: 2026.08.03 16:56:51 +0530

ठिकाण – गुहागर
दिनांक – ०३.०८.२०२६

**( प्रतिक व्ही. कपाडीया )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गुहागर

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | **Shri Dheeraj R. Chavan, Stenographer Grade III** |
| Name of Court | The Court of Civil Judge, (J.D.) and J.M.F.C, Guhagar |
| Date of publish | 03.08.2026 |
| Order Signed by the P.O. on | 03.08.2026 |
| Order Uploaded on | 03.08.2026 |